दै पुण्यनगरी (४)

# विक्रमी ८२ आक्षेपांवर २९ जुलैला सुनावणी

नांदेड, दि.१९: महापालिका सार्वत्रिक निवडणुकीतील प्रभागरचना व आरक्षणाच्या प्रक्रियेवर आक्षेपांचा अक्षरशः पाऊस पडला. बुधवारी (दि.१९) हरकती व सूचना दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी तब्बल ३८ आक्षेप दाखल झाले आहेत. दि. ११ ते १९ या कालावधीदरम्यान दाखल होणाऱ्या आक्षेपांची एकूण संख्या ८२ इतकी झाली आहे. येत्या २९ जुलै रोजी राज्य निवडणूक आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्याच्या उपस्थितीत नांदेड महापालिकेत सुनावणी होणार आहे. या सुनावणीची सर्वच इच्छुकांना उत्सुकता लागली आहे.

महापालिकेच्या २० प्रभागातील ८१ जागेसाठी गेल्या ६ जुलैरोजी आरक्षणाची सोडत काढण्यात आली. परंतु या सोडतीत ओबीसी महिलेची जागा नेमून देताना चूक झाल्यामुळे राज्य निवडणूक आयोगाच्या



- प्रभाग रचना व आरक्षणावर हरकतींचा पाऊस
- शेवटच्या दिवशी तब्बल ३८ आक्षेप दाखल

### मुस्लिमबहुल भागातून सर्वाधिक हरकती

प्रगणक गट व नैसर्गिक सीमांना सुरक्षित न ठेवता मुस्लिमबहुल प्रभागाची रचना केल्याचे आक्षेप मोठ्या प्रमाणावर दाखल झाले आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार मनपाने नकाशा व प्रगणक गट तसेच प्रभाग रचनेचे निकष जाहीर केले नाही. या कारणावरुन विविध नागरिकांनी एकाच पान दोन वर

### तरोडा व सिडकोत एकही आक्षेप नाही

नांदेड महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या तरोडा आणि सिडको भागातील एकाही प्रभागात नागरिकांचे आक्षेप दाखल झाले नसल्याचे सांगण्यात येते. श्रीनगर, वजिराबाद, शिवाजीनगर, गणेशनगर, होळी, गाडीपुरा, यासह देगलूर नाका व जुना नांदेड भागातील राजकीय कार्यकर्ते व नागरिकांनी आक्षेप दाखल केले आहेत.

निर्देशानुसार १० जुलै रोजी फेरसोडत का
पूर्वीची चूक दुरुस्त करण्यात आले
सुधारीत सोडतीमुळे प्रत्येक प्रभागात खु
प्रवर्गासाठी किमान १ जागा सुटल्या
सर्वांचे चेहरे खुलले. परंतु, पूर्वी
आरक्षणात बदल झाल्याने राखीव प्रवर्ग
निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असले
काहींचे चेहरे मात्र हिरमुसले. निवड
नियमावलीनुसार महानगरपालिकेने प्र
केलेली प्रारुप प्रभागरचना त
आरक्षणावर दि. ११ ते १९ जुलै
कालावधीत आक्षेप मागवण्यात आले
महानगरपालिकेच्या मुख्य इमार
असलेल्या आयुक्त कक्षात तब्बल ७७ अ
क्षेत्रिय कार्यालय अ, ब व क मध्ये मिळू
असे एकूण ८२ आक्षेप दाखल झाले आ
महिलांच्या जागांसाठी मंगनाळेंचा
राष्ट्रवादी महिला काँग्रेस
शहराध्यक्षा व माजी नगरसेविका सौ. 
पान दोन

### विक्रमी ८२ आक्षेपांवर...

मंगनाळे यांनी महिलांच्या आरक्षणाची सोडत काढताना तीन प्रभागातील सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांवर अन्याय केल्याचा आक्षेप दाखल केला आहे. त्यांच्या हनुमानगड प्रभागात पुर्वी सर्वसाधारण महिलेसाठी जागा सुटली होती, परंतु ती जागा सर्वसाधारण ऐवजी ओबीसी महिलेसाठी करून सर्वसाधारण प्रवर्गासाठी मार्ग मोकळा केला. मनपाने केलेल्या दोन्ही सोडती नियमानुसार नसल्याने फेरसोडत घ्यावी, असा आक्षेप त्यांनी दाखल केला आहे.

**आजी-माजी नगरसेवकही आघाडीवर**

काँग्रेसचे नगरसेवक किशोर भवरे व शिवसेनेच्या नगरसेविका सुदर्शना खोमणे यांच्यासह माजी उपमहापौर शमीम अब्दुल्ला, माजी नगरसेवक गोविंदप्रसाद बियाणी, नासेरखान, मुकुंद जवळगावकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मिलिंद देशमुख, कृष्णा मंगनाळे या प्रमुख व्यक्तींनी आक्षेप दाखल केले आहेत. प्रभाग क्र. ११ ते १८ मधील राजकीय पुढारी व नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर आक्षेप दाखल केले आहेत.

**भाजप, रिपाईंचा आक्षेप नाही**

काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना व एमआयएम या चारही पक्षाच्या पदाधिकारी किंवा कार्यकर्त्यांनी प्रभागरचना अथवा आरक्षणावर आपल्या हरकती दाखल केल्या. दुसरीकडे भाजपसह रिपाइं व भारिप बहुजन महासंघाच्या कोणत्याही पदाधिकारी अथवा कार्यकर्त्यांनी आक्षेप घेण्याचे मात्र टाळले आहे. मनपातील सत्ताधारी काँग्रेस व राष्ट्रवादी पक्षाच्या एकाही पदाधिकाऱ्यांनी तसेच शिवसेनेच्या विरोधी पक्षनेत्यांनी एकही आक्षेप घेतलेला नाही, हे येथे उल्लेखनीय आहे.

दै सत्यप्रभा (३)

# नांदेड शहरातील प्रभाग रचनेसंदर्भात ८२ आक्षेप दाखल

नांदेड दि. १९ (प्रतिनिधी)– महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या जाहीर झालेल्या प्रभागरचनासंदर्भात हरकती आणि सुचना दाखल करण्यासाठी १९ जुलै ही शेवटची तारीख होती. या दिवसापर्यंत ८२ जणांचे आक्षेप दाखल झाले असून यावर निवडणुक विभागाकडे हे आक्षेप पाठविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

नांदेड महानगरपालिका निवडणुकीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी यावर्षी नव्यानेच प्रभागरचना तयार झाली असून प्रभागरचना आणि आरक्षणावर ज्यांना कोणाला आक्षेप घ्यायचा आहे व हरकती किंवा सुचना नोंदवायच्या असतील त्यांनी दि. ११ ते १९ जुलैच्या दरम्यान मनपा आयुक्त यांच्या कक्षासह क्षेत्रीय कार्यालयामध्ये आक्षेप दाखल करण्यात यावे असे सांगितले होते. या अनुषंगाने शहरातील २० प्रभागातून तब्बल ८२ जणांची आक्षेप दाखल केले आहेत. सुरूवातीला आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली होती. एका प्रभागात ओबीसी महिला देण्यात चुक झाल्यामुळे ती दुरूस्ती करण्यासाठी पुन्हा १० जुलै रोजी आरक्षणाची फेरसोडत काढण्यात आली. यामुळे ५ प्रभागातील आरक्षणाचे चित्र बदलेले होते.



प्रत्येक प्रभागात किमान १ जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी सुटल्यामुळे याचा सर्वांना सारखाच लाभ झाल्याची भावना समोर आली होती. यामुळे आरक्षण सोडतीवर दाखल होणाऱ्या आक्षेपांची संख्या अगदी नगन्य असून सर्वाधिक आक्षेप प्रभागरचनेच्या व्याप्ती व हद्दीबाबत दाखल झाल्याचे समोर आले आहे.